# भा.कृ.अनु.प.—केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

## कापसाच्या लागवडीसाठी १६ ते २२ नोव्हेंबर २०१५ या कालावधीसाठी आठवडी सल्ला

## (५३ वा मानक आठवडा)

“हा सल्ला राज्यातील कृषी विद्यापीठाकडून प्राप्त माहितीवर आधारित आहे”

### हवामानासंबंधी सल्ला

| | नोव्हेंबर मधील पाऊस (मि.मी मधे) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | सल्ला |
| महाराष्ट्र | | | | | | | | |
| नागपूर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | पीक परिपक्वतेच्या अवस्थेत आहे. लाल्याचा प्रार्दुभाव बी.टी. कपाशीमध्ये आढळला. शेतकऱ्यांना लाल्यासंबंधी सतर्कता बाळगण्याचा तसेच आवश्यक व्यवस्थापनाचा सल्ला देण्यात येत आहे. शेतकऱ्यांनी लाल्याला संवदेनशील असे संकरीत वाण ओळखावे व पुढल्या वर्षी ते वाण लावण्याचे टाळावे. तीव्र तापमान आणि कोरडा दुष्काळ यामुळे बोंडगळ जास्त प्रमाणात आढळून आली आहे. किटकनाशकांच्या मिश्र वापरामुळे पांढरीमाशी आणि माव्याचा प्रार्दुभाव काही क्षेत्रामध्ये जास्त प्रमाणात आढळुन आला आहे. साफ आणि स्वच्छ कापुस वेचणीमुळे चांगला बाजारभाव मिळवू शकतो. उशीरा पेरलेल्या वाणांना संरक्षात्मक सिंचणासोबत २% युरिया किंवा २% डि.ए.पी. ची फवारणी फुलधारणेच्या अवस्थेमध्ये करावी. हिरवी बोंडे धरण्याच्या अवस्थेमध्ये १% युरिया आणि १% मॅग्नेशियम सल्फेट ची फवारणी करणे फायदेशीर ठरेल. पानावरील ठिबक्यांचया रोगाचा प्रार्दुभाव काही ठिकाणी आढळून आला आहे. सेंद्रिय बोंडअळीच्या देखरेखीसाठी कामगंद (फेरामोन) सापळयांचा उपयोग करावा. जर एका सापळयामध्ये एका रात्रीत ८ पतंग असे सतत तिन दिवस आढळले तर शिफारशीनुसार योग्य व्यवस्थापन करावे. गुजरात राज्यां लगतच्या जिल्हयांमध्ये तसेच ज्या शेतांमध्ये मार्च/ एप्रिल, २०१५ पर्यंत पिके राहत असल्यास बीजी—I, बीजी—II आणि गैर बी.टी. वाणांमध्ये सेंद्रिय अळीमुळे नुकसान झालेल्या हिरव्या बोंडाची पाहणी करणे आवश्यक आहे. स्वच्छ वेचलेल्या कपाशीची साठवणुक योग्य पध्दतीने करावी. गोणपाटाच्या पिशविचा वापर कपाशीच्या साठवणुकीसाठी टाळावा. कपाशीच्या कवडया, अवशेष तसेच रोगरहीत बियाणे साठवुन ठेऊ नये. कपाशीच्या झाडाचे अवशेष जाळण्यापेक्षा त्याचे कंपोस्ट बनविने फायदेशीर ठरते. |
| वर्धा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| चंद्रपूर | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| यवतमाळ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| अमरावती | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| अकोला | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| बुलढाणा | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| परभणी | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| नांदेड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| बीड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| वाशिम | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| धुळे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| जळगांव | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| जालना | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |
| औरंगाबाद | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | |